# असंभव क्रांती

(ध्यान-साधनेवर आधारित प्रवचने)

**ओशो रजनीश**

अनुवाद

**मीनाक्षी सरदेसाई**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Asambhav Kranti : Osho Rajneesh
Copyright © 1970, 2016 OSHO International Foundation. All Rights reserved.
OSHO is registered trademark of OSHO International Foundation, used under license.
Originally published in Hindi under the title : Asambhav Kranti
First published in Marathi by Riya Publications in arrangement with OSHO International Foundation.

**असंभव क्रांती :** ओशो रजनीश

अनुवाद : मीनाक्षी सरदेसाई

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
मीनाक्षी सरदेसाई
'अनुबंध', कृष्णा हॉस्पिटलजवळ,
पत्रकार नगर, सांगली- ४१६ ४१६
मो. नं. : ९५६१५८२३७२

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ १००/-

# असंभव क्रांती

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवचन पहिले | सत्याचे द्वार | ७ |
| २. | प्रवचन दुसरे | जुन्याचं विसर्जन, नव्याचं सृजन | १९ |
| ३. | प्रवचन तिसरे | मौनाचा स्वर | ३९ |
| ४. | प्रवचन चौथे | ध्यानाचे डोळे | ६० |
| ५. | प्रवचन पाचवे | क्रांतीचा क्षण | ८३ |
| ६. | प्रवचन सहावे | जीवनदर्शन | १०२ |
| ७. | प्रवचन सातवे | सत्याचं संगीत | १२४ |
| ८. | प्रवचन आठवे | सृजनाचं सूत्र | १४२ |
| ९. | प्रवचन नववे | कामवासनेचं रूपांतर | १६३ |
| १०. | प्रवचन दहावे | फक्त एक पाऊल | १८१ |


✦✦✦

## प्रवचन पहिले

# *सत्याचे द्वार*

माझे प्रिय आत्मन,

एक राजा एके दिवशी बागेत फिरायला गेला. तिथे त्याच्या पायात काटा घुसला. त्याला खूप वेदना होऊ लागल्या. आपल्या राजधानीतल्या विद्वानांना त्याने बोलावून घेतलं आणि सांगितलं की, असा काहीतरी उपाय काढा की माझ्या पायात काटा घुसणार नाही. अनेक विद्वानांनी महिनाभर विचार केला. शेवटी त्यांनी असा उपाय सांगितला की, सर्व जमीन कातड्याने झाकावी. शेतकरी घाबरले. सगळी जमीन कातड्याने झाकली तर धान्य कसं पिकणार? एका राजाच्या पायात काटा जाऊ नये म्हणून त्याच्या प्रजेला उपाशी ठेवायचं? लाखो प्रजानन दरबारात आले आणि त्यांनी राजाला विनंती केली. 'दुसरा कोणतातरी उपाय काढा.' पुन्हा विद्वानांना आमंत्रण गेले. त्यांनी सांगितलं की पृथ्वीवरची सगळी धूळ आणि काटे झाडून टाकावेत. अनेक मजूर सगळा परिसर झाडू लागले. आकाश धुळीने भरलं. हजारो लोक आजारी पडले. काही बेशुद्धही झाले. प्रजा घाबरली. पुन्हा लोकांनी राजाला विनवलं, 'हा वेडेपणा आहे. धुळीने आम्हाला जगणं अवघड झालं आहे. श्वास गुदमरतो आहे. धूळ बसावी म्हणून उपाय काढावा.' पुन्हा हजारो मजूर कामाला लागले. पाणी आणून जमीन भिजवू लागले. सर्वत्र चिखल झाला. गरिबांच्या झोपड्या वाहून गेल्या. लोकांनी राजाला विचारलं, 'आम्ही जगावं की मरावं? आपल्या पायात काटा घुसू नये म्हणून साधा उपाय काढावा.' एक म्हातारा सामान्य माणूस राजाकडे आला नि म्हणाला, ''मी हे जोडे आपल्यासाठी बनवले आहेत. हे पायात घाला म्हणजे आपल्याला काटे टोचणार नाहीत.'' राजाला आश्चर्य वाटलं. इतका साधा, सोपा उपाय विद्वान पंडितांना सुचला नाही? राजा विद्वानांवर संतापला. तेव्हा

विद्वान पंडित त्या माणसावर चिडले. ते म्हणाले, 'याला कोणत्यातरी राक्षसाने मदत केली असावी. यातून नक्कीच कोणतं तरी संकट ओढवेल. आम्हा बुद्धिमान पंडितांना जे सुचलं नाही ते या म्हाताऱ्याने कसं काय शोधलं?' असं म्हणून त्यांनी राजाला भडकवलं. राजा घाबरला. त्याने त्या साध्या, म्हाताऱ्या माणसाला सुळावर चढवलं. तो पहिला सुज्ञ, समजदार माणूस फाशी गेला. त्यानंतर ज्यांनी राजाला हा सल्ला दिला की, 'जगाला त्रास देऊ नका. आपले पाय झाका त्या सर्वांना सुळावर चढवलं जातं. कदाचित, त्यामुळेच ज्या क्रांतिकारी व्यक्तीने राजाला जोडे घालण्याचा इलाज सांगितला त्याचे वंशज आज अपमानित आहेत. चांभारांना कोणी मान देत नाही. कदाचित यात त्या पंडितांचाच हात असावा.

या कहाणीने मी या तीन दिवसांतल्या चर्चेला सुरुवात करतो आहे. सगळ्या जगात सर्वांचा एकच प्रश्न आहे की, अशांती, चिंता, अज्ञान, अंधार असे काटे जीवनात त्रास देतात, पण त्यावरचा इलाज कोणता ते समजत नाही. विद्वानांचं ऐकून सगळ्या जगाला झाकण्याची योजना केली जाते पण स्वत:चे पाय झाकण्याची सोपी युक्ती कोणाला सुचत नाही.

इतकी साधी युक्ती, पण या जगात पाच-दहा लोकांनीच ती अमलात आणली. अधिकाधिक लोक पृथ्वी झाकण्याचा प्रयत्न करतात. जगाला बदलायला जातात. या सुधारकांमुळेच सर्व मानवजातीला त्रास सहन करावा लागतो नि त्यातून मुक्त होता येत नाही. या तीन दिवसांत मी ही सोपी युक्तीच तुम्हाला समजावून सांगणार आहे. कारण माणसाच्या समोर हीच एक समस्या आहे. मन:स्वास्थ मिळविण्यासाठी स्वत:ला बदलावं हा उपाय माणसाला सुचत नाही. सर्व दिशांना शोध घेतला जातो; परंतु स्वत:च्या दिशेकडे पाहिलं जात नाही. आपण इतरांना बघतो. स्वत:ला बघत नाही. या तीन दिवसांत या सोप्या गोष्टीचा विचार आपण करू या. पण त्याच्याही आधी मला काही प्राथमिक गोष्टी आपल्याला सांगायच्या आहेत. कारण पुढच्या तीन दिवसांत आपल्याला काहीतरी मिळायला हवं. जीवनातला अंधार दूर करण्यासाठी एखादी प्रकाशरेखा आपल्याला मिळायला हवी. एखादा मार्ग आपल्याला सापडायला हवा की, जो कोंड्यातून बाहेर येण्याची दिशा आपल्याला दाखवेल, पण हा प्रयत्न मी एकटा करणार नाही. तुमचं सहकार्य हवं. नाहीतर मी एखाद्या भिंतीसमोर बोलल्यासारखं होईल. सहकार्य दिलंत तर मात्र तुम्ही भिंत न राहता एक सचेतन व्यक्ती व्हाल.

सुमारे १४०० वर्षांपूर्वी एक फकीर हिंदुस्थानातून चीनमध्ये गेला. सुस्वभावी होता तो. तो नेहमी भिंतीकडे तोंड करून लोकांशी बोलायचा. लोक वैतागले. चीनचे सम्राट त्याला भेटण्यासाठी आले. लोकांकडे पाठ करून, भिंतीकडे तोंड करून तो बोलू लागला. सम्राट म्हणाले, ''हा काय वेडेपणा? तुम्ही माझ्याशी बोलायला आलात ना? मग भिंतीकडे तोंड करून का बोलता?'' फकीर म्हणाला, ''आतापर्यंत मला असा एकही माणूस मिळाला नाही की जो भिंतीसारखा नाही. जर कोणी सहकार्यच केलं नाही, तर बोलण्याचा फायदा काय? बोलणारा भ्रमात राहतो की आपण बोलत आहोत, पण ऐकणारा तिथे नसतोच.'' म्हणून या तीन दिवसांत आपण कोणत्या प्रकारे सहकार्य द्यावं याबाबतची तीन सूत्रं मी आपल्याला सांगेन. या सूत्रांमुळे आपण मला सहकार्य द्याल नि मी जे सांगणार आहे ते तुम्ही नीट ऐकाल. नाहीतर माझं सांगून संपलं तरी आपली ऐकण्याची सुरुवातच झालेली नसेल. मी बोललो नि तुम्ही ऐकलंत एवढंच पुरेसं नाही, मात्र ही गोष्ट एवढी सोपी नाही. ऐकण्यासाठीही आपल्याला काहीतरी करायला हवं. तीन दिवस आपण निष्क्रिय राहिलात तर माझं सांगणं तुम्ही ऐकलंच नाही असं होईल.''

ज्या सत्याची चर्चा आपण करणार आहोत ते ऐकण्यासाठी आपण तत्पर असलं पाहिजे. आपण ऐकलंच नाही तर माझं सांगणं निरर्थक होईल. तुम्हाला वाटेल, हे सांगून गेले, पण आपल्या पदरात काहीच पडलं नाही. खूप होण्यासारखं आहे, पण त्यात माझ्यापेक्षा तुम्ही महत्त्वाचे आहात. तीन सूत्रं आहेत. त्यांच्या बाबतीत आपण थोडी तयारी करायला हवी.

पहिलं सूत्र हे आहे की, या तीन दिवसांत आपण असं समजा की मागे काही नव्हतं आणि पुढे काही नाही. आपण नेहमी असं समजतो की, वर्तमानकाळ नाहीच. मागे होतं नि पुढे असेल, पण खरं म्हणजे वर्तमानकाळ हाच खरा आहे. तेच खरं अस्तित्व आहे. आपण भूतकाळ किंवा भविष्यकाळ यांची चिंता करतो. वर्तमान आपल्याला समजतच नाही. त्यामुळे सत्य जाणण्याचं द्वार आपल्यासाठी उघडतच नाही. आपलं मन भूत-भविष्यात रमलेलं असतं, पण त्यांच्या खुणा या घडीला पृथ्वीवर अस्तित्वातच नसतात, तर फक्त त्यांच्या स्मृतीत असतात. अशा लोकांना सत्याची जाण कधीच येत नाही. सत्य आताच्या क्षणात असतं. इथेच असतं. भूत-भविष्यात नसतं.

गौतम बुद्ध बारा वर्षांनी आपल्या गावी परत आले होते. वडिलांनी त्यांचं स्वागत केलं, पण त्यांच्या मनात राग होता. मुलगा घरदार सोडून गेल्याचं दु:ख होतं. त्यांनी बुद्धाला म्हटलं, ''माझी दारं आजही तुझ्यासाठी उघडी आहेत. तू मला खूप खूप दु:ख दिलंयस; पण मी तुझा पिता आहे. मी तुला क्षमा करतो. तू परत ये.'' बुद्धाने काय सांगितलं माहितीय? ''मी आपल्याला सांगतो ते ऐका. कृपा करून माझ्याकडे बघा. जो बारा वर्षांपूर्वी आपल्या घरातून गेला होता तो आता कुठेही नाहीये. मी दुसराच होऊन परत आलो आहे. मी आता पूर्णपणे नवाच आहे. आपल्याला खरा 'मी' दिसतच नाहीये. कारण आपल्या डोळ्यांत बारा वर्षांपूर्वीचं चित्र आहे. त्याच्याशी तुम्ही बोलत आहात. गंगेतून बरंच पाणी वाहून गेलंय नि मी आता वेगळाच होऊन आलो आहे.'' पिताजी अजूनही रागातच होते. ते म्हणाले, ''मला दुसरा 'तू' माहीत नाहीस. मी तुला जन्म दिला. मला तू शिकवतोस?'' बुद्ध म्हणाले, ''देव करो आणि तुम्हाला कळो की, तुम्ही ज्याला जन्म दिलात तो पुत्र आता कुठे आहे? मी तुम्हाला विनंती करतो की मी आता वास्तवात जो आहे त्याला आपण एकदा तरी बघा. जाणा.''

आपलंही असंच होतं. जीवन क्षणाक्षणाला बदलत असतं नि आपण मागचीच काडी सोडवत राहतो. त्यामुळे खऱ्या जीवनाशी आपण तद्रूप होत नाही. पुढच्या कल्पनांमध्ये आपण हरवून जातो. मी ऐकलेली गोष्ट सांगतो. एक माणूस न्यूयॉर्कला चालला होता. मधल्या एका स्टेशनवर एक तरुण त्याच्या डब्यात शिरला. त्याच्या हातातल्या सामानावरून तो विमा एजंट वाटत होता. म्हाताऱ्या गृहस्थाजवळ तो बसला. त्याने म्हातारबुवांना विचारलं, ''किती वाजले?'' ते म्हणाले, ''क्षमा करा. मी सांगणार नाही.'' तरुणाने विचारलं, ''आपल्याजवळ घड्याळ असून आपण का सांगत नाही?'' म्हातारा गृहस्थ म्हणाला, ''मी नेहमी पुढचा विचार करूनच कोणतंही काम करतो. आता तुम्ही किती वाजले विचारलंत. मी सांगितलं की आपल्या गप्पा सुरू होतील. पुन्हा तुम्ही विचाराल, 'आपण कुठे जात आहात? आपण कुठे राहता?' मी माझा पत्ता तुम्हाला सांगेन नि नाइलाजाने तुम्हाला 'या' म्हणेन. तुम्ही घरी याल. माझी तरुण मुलगी आहे. तिचं तुम्हाला नक्की आकर्षण वाटेल. तुम्ही तिला सिनेमाला बोलवाल. ती कबूल करील. ही कहाणी इतकी पुढे जाईल की, एके दिवशी मी विचारात पडेन की विमा एजंटबरोबर आपल्या मुलीचं लग्न करावं की न करावं? मला तर विमा एजंट